**विषय :-** वक्फ मिळकतीचे हस्तांतरणाचे दस्तऐवजांची नोंदणीबाबत. 003_5

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का.४/प्र.क्र.२४९/०६/१२२८, दि. २३/०८/२००६.

---

क्र.का-४/प्र.क्र. ३९९/२००७/१३६०
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-१
दिनांक :- २१/०९/२००७.

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ चे नियम ४४ मध्ये नवीन खंड ई दाखल करण्यांत आल्यानंतर त्यानुसार दुय्यम निबंधक यांनी दस्त नोंदणी करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर मार्गदर्शनपर सूचना या कार्यालयाच्या संदर्भिय परिपत्रकान्वये देण्यांत आल्या आहेत.

वक्फ कायदा १९९५ चे कलम ५१ नुसार वक्फ बोर्डाची पूर्व मंजुरी असल्याशिवाय वक्फ मिळकतींचे बक्षीस, विक्री, अदलाबदल अथवा गहाणाचे व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे अशा व्यवहाराचे पूर्ततेसाठी करण्यांत आलेल्या दस्तऐवजाची नोंदणी करण्यापूर्वी वक्फ बोर्डाची मंजुरी घेण्यात आली आहे का १ याची खातरजमा करणे हे दुय्यम निबंधक यांचे कर्तव्य आहे. सदर मंजुरी पत्र कोणत्या स्वरुपात असावे याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड यांनी दि. ०८/०८/२००७ चे पत्रान्वये कळविल्यावरुन सर्व दुय्यम निबंधक यांना सूचित करण्यांत येते की, वक्फ बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेले व त्यासोबत वक्फ मंडळाच्या ठरावाची साक्षांकित प्रत असलेले नाहरकत प्रमाणपत्र ग्राहय धरावे.

**का.प्र.मा.नों.म.नि.,**
**यांचे सहीची असे.**

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करिता.**

प्रति,

**सर्व दुय्यम निबंधक (संबंधित नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेमार्फत)**

प्रत :-

**१. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांना...**

**२/- या परिपत्रकाच्या प्रती सर्व अधिनस्त सजिनि/दु.नि. यांना त्वरित पुरवाव्यात व उचित मार्गदर्शन करावे व योग्यरितीने अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवावे.**

**२. वक्फ बोर्ड.**

**३. सर्व कार्यासन अधिकारी.**